# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक 13/12/2019**

**सभा सुचना क्रं. 9 दु.4.30 वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. 19/11/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा.सर्वसाधारण सभा दि. 19/11/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | प्रश्नोत्तरे | निरंक |
| 3. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | निरंक |
| 4. | सुर्या टप्पा 3 योजनेतून वाढीव पाणी उपलब्ध झाल्याने शहरातील उंच साठवण टाकी विद्युत पंपाने न भरता थेट गुरुत्व दाबाने भरणेस्तव आवश्यक त्या ठिकाणी जलवाहीन्या बदलणे कामी येणाऱ्या खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. | **निर्णय / ठराव :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त काम प्रत्यक्ष करताना येणाऱ्या अडचणी व आवश्यक जलवाहीनीच्या लांबीत बदल झाल्याने अनुषंगीक बाबींच्या परिमाणात वाढ झाल्याने तसेच अतिरिक्त बाबींची कामे याच मंजूर ठेकेदाराकडुन करुन घेणे आवश्यक असल्याने या कामी येणाच्या वाढीव रु. 40,93,180/- खर्चासह एकूण रु.1,12,24,645/- सुधारीत खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.115 येथील जुचंद्र मध्ये सदगुरु कृपा बंगलो ते प्रेमनाथ शाळेपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रक्कम रु.1,13,65,812/-इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास आजची सभा प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाहीस करण्यास मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 6. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.105 जुचंद्र मध्ये नायगाव बापाणे मुख्य रस्ता ते सदगुरु कृपा बंगल्यापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | ठराव :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रक्कम रु.1,01,78,487/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाहीस करण्यास मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.105 मधील जुचंद्र टिवरी फाटा येथील बाळकृष्ण संकुल ते सेव्हन स्क्वेअर स्कुल पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | ठराव :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रक्कम रु.1,19,82,148/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाहीस करण्यास मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वार्ड क्र.05 मधील मांडवी तलाव विकसीत करणे कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजत्रकीय रक्कम रु. 3,71,20,058/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या रु. 3,71,20,058/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | **सन 2019-20 हया वर्षात अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर योजनेअंतर्गत वरीलप्रमाणे कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून मंजूर अनुदाना व्यतिरिक्त होणारा खर्च महानगरपालिका फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविण्यात याव्यात असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | **जैविक विविधता समिती स्थापन करणेस मान्यता मिळणेबाबत.** | ठराव/निर्णय:- उपरोक्त विषयावर सभेमध्ये साधक - बाधक सविस्तर चर्चा करणेत आली. जैविक विविधता कायदा 2002 व महाराष्ट्र जैविक विविधता अधिनियम 2008 मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली याचिका क्रमांक 347/2016 दि.09/08/2019 रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने वसई - विरार शहर महानगरपालिकेचे खालील प्रमाणे सदस्य असलेली जैव विविधता व्यवस्थापन समितीची |

स्थापना करून जैवविविधता नोंदवही तयार करणेकरीता ही सभा मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्री.उमेश दत्तात्रेय नाईक | अध्यक्ष |
| 2 | श्री.रूपेश सुदाम जाधव | सदस्य |
| 3 | श्रीम.रंजना लाडक्या थालेकर | सदस्या |
| 4 | श्रीम.अलका सतिश गमज्या | सदस्या |
| 5 | श्री.रमेश जयराम घोरकाना | (अ.ज.) सदस्य |
| 6 | श्री.मार्शल डॉमणिक लोपिस | सदस्य |
| 7 | संजय दिगंबर पिगुळकर | सदस्य |

**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

11. **<u>वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये,माता बाल संगोपन केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यु. व डायलेसीस सेंटर यासाठी 6 महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी वर्गास मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत.</u>**

**ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी 6 महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास मुदतवाढ देणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 53(3) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात 6 महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांचा सेवा कालावधी दि.28/11/2019 रोजी संपुष्टात आलेला आहे. तथापि सदर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा सेवा कालावधी 28 नोव्हेंबर रोजी समाप्त झाल्याने सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाने दि.29/11/2019 रोजी मा. आयुक्त यांना निवेदन देवून वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा ठप्प होऊन नये म्हणून पुढील आदेश होई पर्यंत 1 दिवसांचा तांत्रिक खंड घेवून दि.30/11/2019 रोजी पासून सर्व रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्र, ना.प्रा.आ.केंद्र, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभागा येथे कामकाज करण्याची तयारी दर्शविली होती व त्याप्रमाणे ते दि.30/11/2019 पासून कार्यरत आहेत. आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याकारणाने सदर अधिकारी व कर्मचारी वर्गास एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून मागील कालावधी पासून म्हणजेच दि.30/11/2019 पासून पूर्वलक्षी प्रभावाने पुढील 6 महिन्याच्या कालावधी करीता वैद्यकीय आरोग्य विभागातील रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाने येथील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास कलम 53(3) नुसार मा.सर्वासाधारण सभेच्या पुर्व मंजूरीने सदर

| | | |
|---|---|---|
| | | नेमणूका 6 महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस हरकत नसून या सदर कालावधी मध्ये लवकरात लवकर पुढील 6 महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्ती करणेकामी वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन थेट मुलाखती द्वारे पद भरती प्रक्रिया करणेस ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 12. | **श्री. सुरेंद्र ठाकरे शाखा अभियंता यांना महानगरपालिका सेवेत कायम स्वरुपी सामावून घेणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** श्री. सुरेंद्र ठाकरे हे महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर शाखा अभियंता यांना वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील शाखा अभियंता या समकक्ष वेतनश्रेणीतील समकक्ष पदावर सामावून घेण्याचा प्रशासनाकडून आलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करून आजची ही महासभा खालीप्रमाणे निर्णय घेत आहे.<br>वसई विरार शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध दि. 9 सप्टेंबर, 2014 रोजी मंजूर झाला असून त्यात बांधकाम व पाणी पुरवठा विभागासाठी खालील पदे मंजूर असून त्यांचे नावासमोर त्या पदांच्या वेतनश्रेण्या दर्शविण्यात आल्या आहेत. |

| अ.क्र. | पदाचा तपशिल | मंजूर पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| 1 | शहर अभियंता | 03 | 15600-39100, ग्रेड पे 7600 |
| 2 | कार्यकारी अभियंता | 12 | 15600-39100, ग्रेड पे 6600 |
| 3 | उपअभियंता | 58 | 15600-39100, ग्रेड पे 5400 |
| 4 | शाखा अभियंता | 53 | 9300-34800, ग्रेड पे 4400 |

श्री. सुरेंद्र ठाकरे हे दि. 27/11/2015 पासुन वसई विरार शहर महानगरपालिका मध्ये प्रतिनियुक्तीवर असुन त्यांचेकडे पाणी पुरवठा विभाग सांभाळत आहेत. तसेच ते प्रभाग समिती -जी, वालीव या प्रभाग समितीचा बांधकाम व पाणी पुरवठयाचे कामकाज सांभाळत आहेत. त्यांच्या सेवेची महानगरपालिकेस आवश्यकता आहे. वरील परिस्थितीचा विचार करता श्री. सुरेंद्र ठाकरे यांना वसई विरार शहर महानगरपालिकेच्या शाखा अभियंता या मंजूर पदावर प्रस्तावातील नमूद अटी व शर्तीवर सामावून घेवुन त्यांची सेवा महानगरपालिका सेवेत कायम स्वरूपी वर्ग करणेस आजची ही सभा मंजुरी देत आहे. तथापी

| | | |
|---|---|---|
| | | अट क्र. 5 मध्ये पुढिलप्रमाणे बदल करण्यात यावा. अट क्र. 5 - "श्री. सुरेंद्र ठाकरे यांची सेवा महानगरपालिकेकडे कायम स्वरुपी वर्ग झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन महानगरपालिकेत समावेशनाच्या दिनांकाच्या लगत पुर्वीच्या दिनांकापर्यंत निवृत्त वेतनाच्या दायीत्वाचे रक्कम महानगरपालिकेस द्यावी लागेल."सदर प्रस्तावास मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मंजुरी आवश्यक असल्याने त्या संबंधिचा प्रस्ताव सबंधित विभागाकडे पाठविणेस आजची ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 13. | **महानगरपालिका सेवेत ग्रामपंचायत व नगरपालिकेतून आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेविषयक बाबींबाबत** | **प्रस्तावाचा ठराव व निर्णय:-**<br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-67(2) व सेवाविषयक बाबींना समर्थ करणारी अधिनियमातील इतर सर्व संबंधित कलमान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सर्व स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रस्तावात नमूद भाग-एक मधील 1 ते 15 सेवा विषयक नियम लागू करण्यात येत आहेत. सदर सेवाविषयक नियमान्वये जे लाभ स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांस लागू झालेले आहेत, त्या व्यतिरिक्त लाभ भाग-दोन मध्ये नमूद असून त्यानुसार सदर 1 ते 27 सेवा विषयक बाबी सर्व स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांस लागू राहतील. त्याकरिता प्रस्तावात नमूद 1 ते 9 अटी/शर्ती प्रमाणे कार्यवाही करावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 493 मधील संक्रमणकालीन तरतूदीनुसार महानगरपालिकेत समाविष्ट सर्व स्थायी कर्मचाऱ्यांची पूर्वीची सेवा ही महानगरपालिकेची सेवा समजली जाईल. त्या अनुषंगाने उपरोक्त सर्व सेवाविषयक तरतूदी पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील. त्यानुसार आश्वासित प्रगती योजना/सुधारीत आश्वासित प्रगती योजना लागू केल्यानंतर आकृतीबंधात समाविष्ट असणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार देय असलेली त्यांची सुधारीत वेतनश्रेणी व सुधारीत वेतननिश्चिती त्यांच्या नेमणूकीच्या दिनांकापासून (वेतनश्रेणी लागू केल्याच्या दिनांकापासून) पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील व त्याअनुषंगाने येणाऱ्या फरकाच्या रकमा त्यांना देय असतील. संबंधीत सेवाविषयक बाबींसंदर्भात उपविधी मंजूर होईपर्यंत हा ठराव लागू राहील.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरारशहर महानगरपालिका**